■ मुंबई ■ रायगड ■ ठाणे ■ पालघर येथून एकाच दिवशी प्रकाशित होणारे दैनिक

# आपले साम्राज्य

संपादिका : सीमा प्रमोद मोरे

कार्यकारी संपादिका : अपर्णा प्रणय सकपाळ

■ वर्ष : ५ ■ अंक : २४६ ■ मुंबई ■ सोमवार, १७ ऑगस्ट २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत : १रू. ■ RNI NO. MAHMAR/2021/81699

## ‘लेक लाडकी’ योजनेचा लाभ आता थेट खात्यात

**मुंबई:** मुलींच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या ‘लेक लाडकी’ योजना जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहचावी यासाठी योजनेची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे.लाभार्थी मुलींच्या पालकांना आता ‘आपले सरकार’ पोर्टलद्वारे थेट ऑनलाइन अर्ज करता येणार असून, अर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

यापूर्वीच्या पात्र लाभार्थ्यांनाही संधी मिळावी यासाठी 1 एप्रिल 2024 पासून पात्र लाभार्थ्यांना 15 ऑगस्ट 2027 पर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर पोर्टलवर नोंदणी होणाऱ्या नवीन प्रकरणांसाठी मुलीच्या जन्मानंतर एक वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक राहणार आहे.

नवीन सुलभ प्रक्रियेत आधार क्रमांकाच्या आधारे आवश्यक माहिती Auto Fetch होणार असून लाभार्थी, माता व पिता यांची e-KYC करण्यात येणार आहे. त्यामुळे वारंवार कागदपत्रे सादर करण्याची गरज भासणार नाही. तसेच पुढील टप्प्यांतील लाभांसाठी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही.



संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डिबीटी) लाभाची रक्कम जमा करण्यात येणार असल्याने बँक खात्याची स्वतंत्र माहिती सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच, अंगणवाडी केंद्राशी संबंधित माहितीही लाभार्थ्यांना भरावी लागणार नाही.

या सुलभीकरणामुळे अर्ज प्रक्रिया जलद, पारदर्शक आणि लाभार्थी-केंद्रित होऊन अधिकाधिक पात्र मुलींना योजनेचा लाभ मिळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास मंत्री तटकरे यांनी व्यक्त केला.

महिला व बाल विकास विभागामार्फत मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, त्यांचे सक्षमीकरण करणे आणि मुलींबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने लेक लाडकी योजना राबविण्यात येत आहे.

1 एप्रिल 2023 रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या मुलींना या योजनेअंतर्गत जन्मानंतर 5,000, इयत्ता पहिलीत प्रवेश घेतल्यावर 6,000, सहावीत प्रवेश घेतल्यावर 7,000, अकरावीत प्रवेश घेतल्यावर 8,000 आणि मुलगी 18 वर्षांची झाल्या नंतर 75,000, असा एकूण 1,01,000 आर्थिक लाभ दिला जातो. योजनेसाठी कुटुंब महाराष्ट्राचे रहिवासी असणे, पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड असणे आणि शासनाने निश्चित केलेल्या उत्पन्न व इतर पात्रता अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

## अखिल भारतीय तौहीद फाऊंडेशन, धारावी शाखा, मुंबई यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन




१५ ऑगस्ट २०२६ रोजी शीव ब्लड बँक सहकार्याने अखिल भारतीय तौहीद फाऊंडेशन, मुंबई जिल्हा, धारावी शाखेने १९ वे वार्षिक रक्तदान शिबिर यशस्वीरित्या आयोजित केले होते. शिबिरात १०० हून अधिक रक्तदात्यांनी उत्साहाने भाग घेतला आणि त्यामुळे ते भव्य यशस्वी झाले.

मुंबईचे, शाहूनगर पोलिस कर्मचारी, मुनावर शेख (AIMM), वकील चंद्रलेखा ताई, मतीन शेख (सामाजिक कार्यकर्ते), रवी (भारत जनता CHS सचिव) आणि संजय गंगोल (सामाजिक कार्यकर्ते) यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम शोभायमान झाला.

मुंबई प्रादेशिक अध्यक्ष असन कादर, वैद्यकीय टीमची अध्यक्ष आर. मोहिदीन, शाखा अध्यक्ष दाऊद, कोषाध्यक्ष सलीम, सचिव सादिक आणि संयुक्त सचिव पंच पीर मोहम्मद यांच्या नेतृत्वाखालील आयोजन समितीने, जमातचे इतर सदस्य अब्दुल, बासीथ, मकधुम, वावा मयदीन, फरीद, अकबर, अय्यूब, दानिश, कादर, अदीम, नोमान, नकीब, यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

रक्तदान शिबिर हे सामुदायिक सेवेचे आणि सामाजिक जबाबदारीचे सामर्थ्य दर्शवते. रक्तदात्या, वैद्यकीय पथक आणि स्वयंसेवकांच्या निःस्वार्थ योगदानाशिवाय या कार्यक्रमाचे यश शक्य झाले नसते.

## गरीब रुग्णांच्या अवयव प्रत्यारोपणासाठी कॉर्पस फंडातून मदत

**मुंबई:** गरीब व गरजू रुग्णांच्या अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी शासकीय योजनेतील निधीपेक्षा अधिक खर्च येत असल्यास तो कॉर्पस फंडातून उपलब्ध करून द्यावा. त्याद्वारे राज्यातील अवयवदान आणि अवयव प्रत्यारोपण मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

सर्वसामान्य रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक मंत्रालयातील समिती कक्षात नुकतीच आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.




रुबी हॉल क्लिनिक या अंगीकृत रुग्णालयात कार्डियाक व कॅन्सर उपचारांची सुविधा शासनाच्या एकत्रित महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि पंतप्रधान जन आरोग्य योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. खासगी रुग्णालये आणि शासकीय आरोग्य योजनांच्या समन्वयातून सर्वसामान्य रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी दिले.

### गारगोटी येथे रुबी हॉल क्लिनिकच्या माध्यमातून सुसज्ज डायग्नोस्टिक सेंटर उभे करण्याचे नियोजन

पश्चिम महाराष्ट्रासह सीमावर्ती गोवा व कर्नाटक भागातील आणि ग्रामीण रुग्णांसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथे रुबी हॉल क्लिनिकच्या माध्यमातून सुसज्ज डायग्नोस्टिक सेंटर लवकर सुरू करण्याचे नियोजन आहे. या केंद्रात सीटी स्कॅन, एक्स-रे, ईसीजी, टू-डी इको आणि यूएसजीसारख्या निदान सुविधा माफक दरात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे या भागातील रुग्णांना तपासण्यांसाठी पुणे किंवा मुंबई येथे जाण्याची गरज कमी होणार आहे.

कर्करोगावरील प्रोटॉन थेरपीची सुविधा सध्या महाराष्ट्रात केवळ मुंबईत उपलब्ध असल्याने अनेक रुग्ण या उपचारांपासून वंचित राहतात. त्यामुळे रुबी हॉल क्लिनिक आणि राज्याच्या आरोग्य विभागाच्या समन्वयातून पुण्यात कमी खर्चात प्रोटॉन थेरपीची अत्याधुनिक सुविधा सुरू करण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी रुबी हॉल रुग्णालयाचे विश्वस्त परवेझ ग्रँट, डॉ. सायमन ग्रँड, मुख्य कार्यकारी अधिकारी मुदित सक्सेना, जनरल मॅनेजर सचिन दंडवते, पूनम चव्हाण, आरोग्य विभागाचे सह सचिव मिलिंद कदम, वैद्यकीय सहायता कक्ष, पुणे येथील कौस्तुभ थोरात, प्रसाद बिराजदार आणि गणेश तिकोने उपस्थित होते.

## अठरा वर्ष पूर्ण झालेल्या अनाथ बालकांना स्वावलंबनासाठी आर्थिक मदतीचे वाटप

मुंबई: महिला व बालविकास विभागाच्या विविध कल्याणकारी योजना व उपक्रमांच्या माध्यमातून महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून मुंबई शहर जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून व निर्देशानुसार बालगृह/सामाजिक संस्थांमध्ये राहणाऱ्या बालकांना अठरा वर्षांनंतर स्वावलंबी होण्यासाठी आर्थिक आधार देण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, मुंबई शहर, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि रिक्ता फाउंडेशन, दिल्ली यांच्या समन्वयाने आज श्री मानव सेवा संघ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार, बालकल्याण समिती मुंबई शहरचे अध्यक्ष महादेव सावंत, रिक्ता फाउंडेशन दिल्लीचे संस्थापक के. पोर्थो, विश्वस्त अरुणा चक्रवर्ती, तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अधिकारी-कर्मचारी, श्री मानव सेवा संघ, श्रद्धानंद, आशा सदन, सेंट जोसेफ या संस्थांचे प्रतिनिधी आणि लाभार्थी बालके उपस्थित होते.




या कार्यक्रमात मुंबई शहर जिल्ह्यातील विविध बालगृहांमधील दोन्ही पालक किंवा एका पालकाला गमावलेल्या 25 बालकांना रिक्ता फाउंडेशनच्या वतीने प्रत्येकी 20 हजार रुपयांची आर्थिक मदत एफडीच्या माध्यमातून देण्यात आली. या बालकांच्या नावाने पोस्टामध्ये उघडण्यात आलेल्या नॅशनल सेविंग सर्टिफिकेटचे पासबुकही यावेळी वितरित करण्यात आले.

दरम्यान, कोविड-19 महामारीच्या काळात दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना राज्य शासनाच्या माध्यमातून प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली होती. शासन निर्णयानुसार बालकाचे वय 21 वर्षे पूर्ण झाल्यानंतर ही मुदत ठेव संबंधित लाभार्थ्यास देणे बंधनकारक आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, मुंबई शहर अंतर्गत एकूण 19 अनाथ बालके या आर्थिक मदतीस पात्र ठरली आहेत. त्यापैकी वयाची 21 वर्षे पूर्ण झालेल्या चार युवकांना पाच लाख रुपयांच्या मुदत ठेवीचा लाभ आज वितरित करण्यात आला.

या उपक्रमामुळे संस्थांमधून बाहेर पडणाऱ्या बालकांना भविष्यात शिक्षण, रोजगार, व्यवसाय किंवा इतर गरजांसाठी आर्थिक आधार मिळणार असून, त्यांना स्वावलंबी जीवन जगण्यास मदत होणार आहे.

## विझाग पारेषण प्रकल्प अदानी एनर्जीच्या ताब्यात




आरईसीपीडीसीएलने आंतरराज्य पारेषण प्रकल्पाची विशेष उद्देश कंपनी (एसपीव्ही) असलेल्या विझाग पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडचा ताबा मे. अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडकडे सोपवला.

ऊर्जा मंत्रालयाच्या अखत्यारीतील महारत्न केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (CPSU) असलेल्या आरईसी लिमिटेडची पूर्ण मालकीची उपकंपनी, आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सल्टन्सी लिमिटेडने (RECPDCL), प्रकल्पासाठीचे विशेष उद्देश वाहन (SPV), विझाग पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड, यशस्वी बोलीदार मे. अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड यांच्याकडे १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सुपूर्द केले.

आरईसीपीडीसी एल (RECPDCL), बोली प्रक्रिया समन्वयक, यांनी आयोजित केलेल्या दर-आधारित स्पर्धात्मक बोली (TBCB) प्रक्रियेद्वारे, मेसर्स अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड हे “आंध्र प्रदेशातील विझाग परिसरातील प्रस्तावित हरित हायड्रोजन / हरित अमोनिया प्रकल्पांसाठी पारेषण प्रणाली (टप्पा-१)” या आंतरराज्यीय पारेषण प्रकल्पाच्या विकासासाठी, ‘बांधा, मालकी मिळवा, चालवा आणि हस्तांतरित करा’ (BOOT) तत्त्वावर यशस्वी बोलीदार म्हणून उदयास आले.

आरईसीपीडीसीएलचे विभाग प्रमुख (सीएस), श्री राजकुमार सोनकर यांच्या हस्ते, आरईसीपीडीसीएल, अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड आणि सेंट्रल ट्रान्समिशन युटिलिटी ऑफ इंडिया लिमिटेड येथील जीएम (इंजिनिअरिंग) श्री रत्नेश कुमार आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, एसपीव्ही अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडचे सीबीडीओ, श्री शशांक शर्मा यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

या पारेषण प्रकल्पात ढोबळमानाने ४x१५०० एमव्हीए, ७६५/४०० केव्ही पेंदुर्थी जीआयएस उपकेंद्र आणि ३x१५००, ७६५/४०० केव्ही खम्मम-२ उपकेंद्र, पेंदुर्थी ते श्रीकाकुलम (२२६ किमी), खम्मम-२ ते वारंगल न्यू (१५३ किमी), खम्मम-२ ते पेंदुर्थी (३३८ किमी) पर्यंतची ७६५ केव्ही डी/सी लाईन, तसेच खम्मम-२ ते खम्मम (विद्यमान) (६० किमी) पर्यंतची ४०० केव्ही डी/सी लाईन आणि संबंधित कामांचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक ३० महिन्यांचे असून, त्याचा अंदाजित खर्च ८,३८६ कोटी रुपये आहे.

## नागपुरात भाजप नेते, कार्यकर्त्यांना रविंद्र चव्हाण यांच्या कडून प्रत्यक्ष बैठकीत थेट कानपिचक्या



**मुंबई:** नागपूर पदवीधर मतदारसंघातील विजयासाठी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील एकूण अंदाजे बारा लक्ष सुशिक्षित पदवीधर मतदारांपैकी किमान पन्नास हजार नवे मतदार नोंदणी करून घ्यावे आणि सोशल मीडियावर तसेच नागरिकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटीत सक्रिय होत केंद्र तसेच राज्य सरकारने केलेल्या कामांचे प्रमोशन करावे अशा सूचना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेत्यांना दिल्या.

नागपुरात मंचावर राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, भाजप आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, परिणय फुके आणि शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी असताना या कानपिचक्या त्यांनी दिल्या आहेत. नागपूर पदवीधर मतदारसंघाची निवडणूक अवघ्या चार महिन्यांवर येऊन ठेपली असताना आतापासूनच भाजपने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्यावेळी प्रथमच भाजपला पराभवाचा सामना करावा लागला होता त्याची आठवण करून देत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पूर्व विदर्भात दोन दिवसांत सहा बैठका घेतल्या.

नागपूर च्या एअरपोर्ट बँकवेट हॉल येथील आपल्या दौऱ्याच्या अंतिम बैठकीत नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि वर्धा येथील प्रमुख भाजप पदाधिकारी, नगरसेवक आणि नेत्यांच्या उपस्थितीत भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वात आधी आपल्याला ही निवडणूक जिंकायची आहे का..आपली तशी इच्छा आहे का..असा सवाल टाकत रवींद्र चव्हाण यांनी सर्व उपस्थितांची विकेट घेतली.डिजिटल प्लॅटफॉर्म वर आपल्यापैकी किती जणांची सक्रिय उपस्थिती असते असे पुढे सवाल करत त्यांनी सर्व उपस्थितांना अंतर्मुख केले.. आणि आपण सोशल मीडियावर कमी पडतो, असे सरळ स्पष्ट विधान करून कानपिचक्या दिल्या. रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की नागपूर शहर, ग्रामीण आणि वर्धा मिळून सुमारे अंदाजे सत्तर लाख लोकसंख्या आहे. यापैकी सुशिक्षित पदवीधर अंदाजे 12 लाख असावेत असा अंदाज आहे.

# संपादकीय

## प्लास्टिकच्या विळख्यात नद्या, निसर्ग आणि आपण

भीमा आणि उल्हास या महाराष्ट्रातील महत्त्वाच्या नद्यांमधील वरडोळा माशांच्या पचनसंस्थेत मायक्रोप्लास्टिकचे कण आढळल्याचे संशोधन नुकतेच समोर आले आहे. ही बाब केवळ जलप्रदूषणाची समस्या नाही; ती मानवी आरोग्य, जैवविविधता आणि संपूर्ण अन्नसाखळीसमोर उभे ठाकलेले गंभीर संकट आहे. प्लास्टिकचा वापर आपण इतक्या सहजतेने आणि मोठ्या प्रमाणावर करू लागलो आहोत की त्याचे परिणाम आता आपल्या घराच्या दारापर्यंत येऊन पोहोचले आहेत.

भीमा आणि उल्हास नद्यांमध्ये केलेल्या संशोधनात वरडोळा या माशांच्या शरीरात पॉलीथिलीन आणि पॉलीप्रॉपलीन या प्रकारच्या प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळले. उल्हास नदीतील सुमारे ३५.७१ टक्के, तर भीमा नदीतील ६५ टक्के माशांच्या पचनसंस्थेत हे कण सापडले. वरडोळा मासा नदीच्या तळाशी असलेल्या गाळातून अन्न शोधतो. याच गाळात जमा झालेले प्लास्टिकचे कण खाद्यामार्फत त्याच्या शरीरात पोहोचतात. म्हणजेच माणसाने नदीत टाकलेला कचरा आता नदीतील जीवांच्या शरीराचा भाग बनत आहे.

मायक्रोप्लास्टिक म्हणजे प्लास्टिकचे अतिशय सूक्ष्म कण. मोठ्या प्लास्टिक वस्तूंचे सूर्यप्रकाश, पाणी, घर्षण आणि इतर नैसर्गिक प्रक्रियांमुळे हळूहळू विघटन होत जाते आणि त्यातून हे कण तयार होतात. समस्या अशी की प्लास्टिक पूर्णपणे नष्ट होत नाही; ते अधिकाधिक लहान कणांमध्ये विभागले जाते. त्यामुळे ते पाणी, माती, हवा आणि अन्नाच्या माध्यमातून विविध सजीवांच्या शरीरात पोहोचते.

माशांच्या शरीरात प्लास्टिक आढळणे हे विशेष चिंताजनक आहे. कारण मासे हे अनेक पक्षी, प्राणी आणि माणसांच्या आहाराचा भाग आहेत. त्यामुळे एका माशाच्या शरीरात गेलेले सूक्ष्म प्लास्टिक अन्नसाखळीच्या पुढच्या टप्प्यावर पोहोचू शकते. अशा प्रकारे प्लास्टिकचे प्रदूषण केवळ नदीपुरते मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम संपूर्ण परिसंस्थेवर होतो.

ही समस्या केवळ भीमा आणि उल्हास नद्यांपुरती मर्यादित नाही. जगाच्या विविध भागांतील संशोधनांमध्ये मासे, शिंपले, कासवे, डॉल्फिन, व्हेल, सील, पक्षी, उंदीर, बेडूक आणि पाळीव प्राण्यांच्या शरीरातही प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळले आहेत. काही ठिकाणी गायी-म्हशींच्या पोटातून शस्त्रक्रिया करून मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा बाहेर काढावा लागला आहे. अन्नाच्या शोधात असताना प्राणी प्लास्टिकच्या पिशव्या आणि खाद्यपदार्थांची आवरणे खातात. त्यांना त्यातील अन्न आणि प्लास्टिक यातील फरक कळत नाही. परिणामी प्लास्टिक त्यांच्या पोटात साठत जाते आणि त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.

समुद्रातील जीवांची स्थितीही वेगळी नाही. कासवे आणि समुद्री सस्तन प्राणी प्लास्टिकचा कचरा अन्न समजून गिळतात. काही वेळा त्यांच्या पोटात इतका प्लास्टिक कचरा सापडतो की त्यातून त्यांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होते. जमिनीवरील प्राण्यांनाही याच संकटाचा सामना करावा लागत आहे. जंगलांमध्ये पर्यटकांनी किंवा इतरांनी टाकलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या आणि खाद्यपदार्थांची पाकिटे वन्यजीवांच्या संपर्कात येतात.

याहून गंभीर बाब म्हणजे प्लास्टिक आता केवळ नद्या, समुद्र किंवा जंगलांमध्ये नाही. हिमनद्या, समुद्राचा तळ, माती आणि हवेतही त्याचे सूक्ष्म कण आढळत आहेत. म्हणजेच मानव जिथे पोहोचला आहे, तिथे प्लास्टिक पोहोचले आहे. आपण सोयीसाठी निर्माण केलेल्या या पदार्थाने आता निसर्गाच्या प्रत्येक स्तरात प्रवेश केला आहे.

मानवी शरीरही या संकटापासून सुरक्षित नाही. हवा, पाणी आणि अन्नातून सूक्ष्म प्लास्टिकचे कण शरीरात प्रवेश करू शकतात. त्यामुळे प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ पर्यावरणाचा नसून सार्वजनिक आरोग्याचाही आहे. प्लास्टिकचा वाढता वापर आणि त्याचे अयोग्य व्यवस्थापन यामुळे भविष्यात या समस्येची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे.



### आजची चित्रोळी

मना शान्तता गांवात मिळते छान
शहरात गर्दीने विस्कटून जाते भान !
एकाग्र मनाने सुटती अवघड कोडी
शहरात मानवा उसंत नसते थोडी !!

**मुकुंद कुलकर्णी**

# मागण्या मान्य करा, अन्यथा सांबरकुंड धरणाला विरोध!

## रामराज ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभेत प्रकल्पग्रस्तांचा आक्रमक पवित्रा; मागण्यांचा ठराव बहुमताने मंजूर

अलिबाग / रत्नाकर पाटील - अलिबाग तालुक्यातील बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित सांबरकुंड मध्यम प्रकल्पाला आता प्रकल्पग्रस्तांच्या विरोधाची धार मिळण्याची शक्यता आहे. “धरणाला आमचा विरोध नाही; मात्र आमच्या न्याय्य मागण्या मान्य करा आणि खुशाल धरण उभारा,” अशी स्पष्ट भूमिका प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी घेतली आहे. शासनाकडून धरण प्रकल्पाच्या कामाला गती दिली जात असताना बाधितांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत मागण्या मान्य न झाल्यास जमिनी देणार नाही, असा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला १४ ऑगस्ट रोजी रामराज ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभेत सांबरकुंड-पाचगाव प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या मागण्यांवर चर्चा होऊन ग्रामसभेने बहुमताने ठराव मंजूर केला. तसेच हा ठराव शासनाला अधिकृत पत्रव्यवहाराद्वारे कळविण्याचा निर्णयही घेण्यात आला.

ग्रामसभेचे अध्यक्ष मोहन दत्तात्रेय धुमाळ यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांनी आपल्या मागण्यांचा लेखी अर्ज सादर केला. यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या रास्त असून, सांबरकुंड धरणाचा फायदा रामराज ग्रामपंचायत हद्दीसह संपूर्ण अलिबाग तालुक्याला होणार असल्याने ग्रामपंचायत परिसरातील नागरिक प्रकल्पग्रस्तांच्या न्यायाच्या लढ्यात त्यांच्या पाठीशी



राहतील, असे अप्पा पालकर यांनी स्पष्ट केले.

प्रकल्पग्रस्तांच्या वतीने रमेश धनावडे यांनी ग्रामसभेसमोर बाधित शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यांच्या वेदना मांडल्या. मागण्यांवर उपस्थित ग्रामस्थांचा आक्षेप आहे का, अशी विचारणा ग्रामसेवकांनी केली असता, उपस्थितांनी मागण्यांचा ठराव तातडीने मंजूर करून शासनाला कळवावा, अशी भूमिका घेतली.

**प्रकल्पग्रस्तांच्या प्रमुख मागण्या**

संपादित होणाऱ्या जमिनीला प्रति गुंठा १० लाख रुपये मोबदला द्यावा, कालवा परिसरातील बाधित शेतकऱ्यांना जमिनीच्या बदल्यात शेतजमीन द्यावी, पुनर्वसन करताना साडेबावीस टक्के निर्णय लागू करावा, पुनर्वसन वसाहतीमध्ये सर्व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच बाधित शेतकऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे पेन्शन योजना लागू करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

याशिवाय सांबरकुंड प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पात भागीदारी द्यावी, शासकीय सेवेत नोकरी द्यावी, जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रातील रोजगारात प्राधान्य द्यावे, प्रकल्पाच्या कामात स्थानिक बेरोजगारांना रोजगाराची संधी द्यावी, तसेच धरणाचे पाणी औद्योगिक वापरासाठी जाणार असल्यास संबंधित प्रकल्पांमध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. धरणाच्या भिंतीसमोर येणाऱ्या महान आणि महानवाडी गावांचे पुनर्वसन करावे, धरण उभारण्यापूर्वी भिंतीसमोरील दोन किलोमीटर परिसराचा भूवैज्ञानिक सर्वेक्षण करावा, धरणासाठी करण्यात आलेली अंतिम निवड रद्द करून नव्याने अंतिम निवड करावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

विहित वेळेत प्रकल्प उभारण्यात आलेला नसल्याने भूसंपादन प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील नोंदी रद्द करून सातबारा कोरा करून द्यावा, अशी मागणीही प्रकल्पग्रस्तांनी केली आहे.

आजपर्यंत प्रकल्पाला विरोध नसल्याची भूमिका प्रकल्पग्रस्तांनी कायम ठेवली आहे. मात्र शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष करून प्रकल्पाच्या कामाला वेग दिल्यास संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामसभेतून देण्यात आला. त्यामुळे सांबरकुंड धरणाच्या उभारणीपूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर शासन काय निर्णय घेते, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# सातारा भाजप बैठकीत श्री गोळे यांची फरपट ही अफवा - श्रीहरी गोळे

सातारा (अजित जगताप) : सातारा जिल्ह्यामध्ये जो पक्ष सत्तेमध्ये सामील होतो. त्या पक्षाचा बालेकिल्ला तयार करण्याचा पॅटर्न आलेला आहे. याचा अनुभव सर्वच राजकीय पक्षांनी घेतला आहे. आता तर श्रावण मास आरंभ सुरू होण्याच्या दिवशीच गुरुवारी दिनांक १३ ऑगस्ट रोजी साताऱ्यात भाजप बैठकीत सामान्य कार्यकर्त्याची फरपट झाली. अखेर वरिष्ठ भाजप नेत्यांनी शिस्तीने वागा. असा सल्ला देऊन हे प्रकरण कमळाच्या पाकळीत मिटवण्याचा प्रयत्न केला. घर घर तिरंगा झेंडा पोहोचवण्याची जबाबदारी भाजप नेत्यांनी मोठ्या उत्साहात पार पाडले असतानाच जावळी तालुक्यात भाजप पक्षालाच घरघर लागल्याचे दिसून आले आहे. दरम्यान भाजप बैठकीचे जे वृत्त प्रसिद्ध झाले की निव्वळ अफवा आहे असा खुलासा श्रीहरी गोळे यांनी दिला आहे

याबाबत माहिती अशी की, सातारा जिल्हा भाजपच्या वतीने सेवा अभियान विक्रम चव्हाण निमित्त सातारा शहरातील सातारा जिल्हा शासकीय विश्रामगृहामध्ये सकाळी दहा ते सायंकाळपर्यंत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला भाजपचे निष्ठावंत तसेच नवोदित कार्यकर्ते-पदाधिकारी व वरिष्ठ नेते विक्रम पावसकर, आमदार धैर्यशील कदम, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे स्वीय सहाय्यक संतोष साखरे , सरचिटणीस महिला आघाडी मनीषा पांडे, विठ्ठल बलशेठवार व विकास गोसावी, भाजप जावळी तालुका अध्यक्ष संदीप परामणे, उपाध्यक्ष विकास धोंडे, माजी सरचिटणीस प्रदीप बेलोशे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी व भाजप प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजप पक्षाच्या ध्येयधोरणानुसार कार्यक्रम राबवण्याबाबत चर्चा सुरू झाली होती. अनेक भाजप कार्यकर्त्यांनी सेवा अभियानामध्ये आपापल्या भागात केलेल्या सेवा अभियानात अनेकांची निवेदन घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावले. कामाचा आढावा घेतला.

याच वेळी जावळी



तालुक्यातील भाजप जिल्हा परिषद सदस्य व वजनदार नेते वसंतराव मानकुमरे व जावळी तालुक्यातील माजी अध्यक्ष तथा हातगेघर येथील अटल पर्यटन व बहुउद्देशीय संस्था मर्यादित चेअरमन श्रीहरी गोळे यांच्यामध्ये सुरुवातीला शाब्दिक सामना रंगला. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या विकास सेवा सोसायटीच्या मतदारसंघातून ठराव घेण्यासाठी गेल्या आठवड्यात नाट्य घडले. हातगेघर, कावडी, पानस, विवर ,सायघर, आखेगणी ग्रुप विकास सेवा सोसायटीच्या ठरावाबाबत मिठाचा खडा पडला. आणि हा ठराव बारगळला. याचा राग मनात धरून भाजपच्या सेवा सप्ताह बैठकीतच आगळीवेगळी सेवा सुरू झाली. जिल्हा परिषद सदस्य श्री . मानकुमरे व श्री गोळे यांनी एकमेकांचा चांगलाच सन्मान केला. भाजपचे या दोन मातब्बर नेत्यांची हातघाई पाहून अखेर भाजप जावळी तालुका अध्यक्ष संदीप परामणे यांनीच मध्यस्थी करून दोघांना शांत केले.

सदर झालेल्या प्रकाराने व्यतीत झालेल्या भाजपचे वरिष्ठ नेते विक्रम पावसकर यांनी सर्वांनाच मग खडे बोल सुनावले. ही काँग्रेस- राष्ट्रवादी नाही. भाजप आहे. शिस्तीने वागा .असा सल्ला दिला. खरोखरच अशा सल्ल्याची गेल्याच आठवड्यात गरज होती. परंतु, पहिला अंक संपल्यानंतर दुसरा अंक सुद्धा लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. असा भाजप पक्षातील पारदर्शक कारभार असल्यामुळे हा दुसरा अंक सुद्धा सातारा शासकीय विश्रामगृहामध्ये कार्यकर्ते व लोकांसमोर आलेला आहे. आता तिसरा अंक काय घडते? याकडे आता उत्सुकता लागलेली आहे. तसं पाहिलं तर वीस एक वर्षांपूर्वी भाजपा शिस्तीचा पक्ष म्हणून काँग्रेस-राष्ट्रवादी सुद्धा भाजप कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना सातारा जिल्ह्यात सन्मानाने पाहत होते. आता फक्त सत्तेची ऊब आपल्यापर्यंत पोहोचावी. यासाठी नेते धडपडतात म्हणून कार्यकर्ते त्याचे अनुकरण करतात. त्यामुळेच असा प्रकार घडला आहे. भाजपच्या या बैठकीमध्ये झालेल्या प्रकारामुळे भाजप सामान्य कार्यकर्ता सुरक्षित नसेल तर भाजपचे काम करून कुणाची सुरक्षा व सेवा आपण करू शकतो? याचे आता आत्मचिंतन करावे लागणार आहे.

भाजपमध्ये अनेक निष्ठावंत व प्रामाणिक नेते व पदाधिकारी आहेत. परंतु त्यांनाही सत्तेचे गणित जुळवताना काँग्रेसमय वातावरण स्वीकारावे लागत आहे. याचा अनुभव घेण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. झालेल्या प्रकारामुळे भाजपमध्ये इतर पक्षाचे संस्कृतीचा शिरकाव झाला. हे तरी आता मान्य करावे. असे आता सुचित करावे वाटत आहे. अशी खंत जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, भाजपने जिल्हा परिषदेमध्ये व काही पंचायत समितीमध्ये सत्ता मिळवली आहे. आता सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये सत्ता मिळवण्यासाठी हॅट्रिक करण्याची वेळ आली आहे. दोन्ही सत्ता मिळवताना राडा झाला. आता हॅट्रिकच्या वेळेला भाजपने एकमेकांचे डोके फोडू नये. अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, याबाबत जावळी तालुक्यातील दोन्ही नेत्यांची संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे त्यांच्या भूमिकेचा भुंगा कमळात अडकला की काय? अशी शंका घेतली जात आहे.

# उपकेंद्रांचा कायापालट करून नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न !

पेण (प्रशांत पोतदार) - पेण तालुक्यातील जिते प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समितीची आढावा बैठक जिल्हा परिषदेचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली.

ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्रांसह सर्व उपकेंद्रांमधून दर्जेदार आणि वेळेवर आरोग्यसेवा मिळावी, यासाठी आरोग्य विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

तालुक्यातील अनेक उपकेंद्रांच्या इमारतींची अवस्था खराब झाल्याने त्यांचे स्ट्रक्चर ऑडिट करून अहवाल जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच उपकेंद्रांमध्ये डॉक्टरांची कमतरता असून, रिक्त पदांची माहिती घेऊन ती भरून काढण्यासाठी आवश्यक अहवाल तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले.

नागरिकांना आवश्यक औषधे वेळेत उपलब्ध व्हावीत, यासाठी औषधांचा नियमित पुरवठा करण्याबाबतही चर्चा झाली.



“तालुक्यातील प्रत्येक उपकेंद्रातून नागरिकांना अत्यंत चांगल्या पद्धतीने आरोग्यसेवा मिळावी, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचा प्रयत्न आहे,” असे सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले. बैठकीत ग्रामीण भागातील स्वच्छतेच्या प्रश्नावरही चर्चा करण्यात आली. गावांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी गटविकास अधिकारी, ग्रामसेवक आणि तालुका आरोग्य अधिकारी यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. साथीचे आजार पसरू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, डास प्रतिबंधक फवारणी तसेच नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यावर भर देण्यात येणार आहे, ग्रामीण भागात जन आरोग्य शिबिरे आणि रक्त तपासणी शिबिरे आयोजित करून नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आरोग्यसेवेच्या माध्यमातून ग्रामीण भागात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रशासन आणि आरोग्य विभागाच्या समन्वयाने काम केले जाईल, असा विश्वास सभापती वैकुंठ पाटील यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी त्यांच्या समवेत पंचायत समिती च्या सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर,पेण तालुका आरोग्य अधिकारी सुनील नखाते, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका, ग्रामसेवक, पाणी विभाग शासकीय अधिकारी, उपसरपंच, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# माथेरान मध्ये उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा गरजू रुग्णांसाठी व्हील चेअर व बेडचा समजोउपयोगी उपक्रम

माथेरान / चंद्रकांत सुतार - माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७९वा वर्धापन दिन शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. अधीक्षक कार्यालय येथे सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी अधीक्षक माथेरान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्या नंतर

नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्ष मा. चंद्रकांत रमेश चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच असेंबली हॉल येथे उपनगराध्यक्ष संतोष अरविंद शेलार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नगरपरिषद



पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्यसैनिक, हुतात्मे आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना विविध स्मारकांवर पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माजी सैनिक कै. विनय धनाडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नगरसेवक केतन रमेश रामाणे व दिव्यांग कल्याण समितीच्या सभापती मा. सौ. रिझवाना अनिस शेख यांनी पुष्पहार अर्पण केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास नगरसेवक तथा शहरप्रमुख मनोज वसंत खेडकर यांनी, तर वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या पुतळ्यास सभापती नियोजन, पर्यटन व पर्यावरण समिती श्री. शिवाजी शांताराम शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हुतात्मा स्मारक येथेही अभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक स्तंभास नगरसेविका प्रियांका कदम नगरसेवक सोहेल महापुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तर मी हुतात्मा भाई कोतवाल यांच्या निवासस्थानी मेघा कोतवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . हुतात्मा स्मारक येथे सार्वजनिक बांधकाम सभापती गौरव वाघेला यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच हुतात्मा स्मारक वीर साधनाबाई कोतवाल हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेस नगरसेवक किशोर मोरे नगरसेविका ऐश्वर्या यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला स्वातंत्र सैनिकांच्या नामपलकास नगरसेविका अर्चना भिलारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तर हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या शिल्पास नगरसेवक प्रवीण सकपाळ नगरसेविका प्रतिभा घावरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर नगरपरिषदेच्या वतीने उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

दरम्यान, स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिव्यांग कल्याण समितीच्या सभापती मा. सौ. रिझवाना अनिस शेख यांच्या पुढाकाराने मुस्लिम मोहल्ला विभागातील गरजू रुग्णांसाठी विशेष समाजोपयोगी उपक्रम सुरू करण्यात येणार आहे. रुग्णांच्या उपयोगासाठी Well Comfort Bed आणि Wheel Chair उपलब्ध करून देण्यात येणार असून, एका रुग्णाचा वापर झाल्यानंतर हे साहित्य पुढील गरजू रुग्णाला हस्तांतरित करून पुन्हा वापरण्याची योजना आहे. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# अटल सेतूपासून गावकुसापर्यंत रायगडचा विकासवेग; 'तिसऱ्या मुंबई'च्या उभारणीला नवी दिशा!

## स्वातंत्र्यदिन सोहळ्यात मंत्री भरत गोगावले यांचा विकासाचा रोडमॅप; शेतकरी, महिला, युवक आणि जलसंधारणाला प्राधान्य

अलिबाग (रत्नाकर पाटील) : अटल सेतू, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सागरी मार्ग आणि विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे रायगड जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळत आहे. भविष्यात रायगडमध्ये 'तिसरी मुंबई' आकारास येत असून, या विकासाला लोकसहभागाची जोड देऊन विकसित रायगड साकारण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे, असे प्रतिपादन रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी केले.

अलिबाग येथील पोलीस परेड मैदानावर भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय समारंभात मंत्री गोगावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांना अभिवादन करून मंत्री गोगावले यांनी रायगडच्या विकासाचे विविध पैलू मांडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगड जिल्ह्यातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.



**शेतकऱ्यांच्या खात्यात १० कोटी ९५ लाख**

शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदू असल्याचे सांगत मंत्री गोगावले यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६'च्या अंमलबजावणीची माहिती दिली. जिल्ह्यात २ हजार ८०० हून अधिक शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण पूर्ण झाले असून, १ हजार ८५९ शेतकऱ्यांच्या खात्यात १० कोटी ९५ लाख रुपये थेट जमा करण्यात आले आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येत आहे.

**ग्रामपंचायतींची राष्ट्रीय स्तरावर मोहर**

रायगडच्या ग्रामविकासाचीही यावेळी दखल घेण्यात आली. खालापूर तालुक्यातील खरीवली ग्रामपंचायतीने जलसमृद्ध श्रेणीत देशात प्रथम, चांभारलीने सामाजिक सुरक्षेत देशात द्वितीय, वासांबेने आत्मनिर्भर पंचायत श्रेणीत देशात प्रथम, तर अलिबाग तालुक्यातील वाडगाव ग्रामपंचायतीने आदिशक्ती अभियानात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे रायगडच्या ग्रामीण विकासाची देशपातळीवर छाप उमटल्याचे मंत्री गोगावले यांनी नमूद केले.

**४ लाख ७६ हजार महिलांना थेट लाभ**

महिलांच्या सुरक्षेसाठी जिल्ह्यात १५१ हेल्पलाईन आणि १६ हिरकणी कक्ष कार्यरत आहेत. 'लाडकी बहीण' योजनेचा ४ लाख ७६ हजार महिलांना दरमहा दीड हजार रुपयांचा लाभ थेट मिळत आहे. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबविण्यात येत आहे.

**'वॉक फॉर वॉटर'मधून जलसंधारणाचा संदेश**

माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या स्मृतीनिमित्त १५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह साजरा केला जात आहे. २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. पाण्याचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा आणि 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा संकल्प करावा, असे आवाहन मंत्री गोगावले यांनी केले.

यावेळी जलसंधारण सप्ताहाच्या लोगोचे अनावरण करून उपस्थितांना जलप्रतिज्ञा देण्यात आली. उल्लेखनीय कामगिरी करणारे पोलीस अधिकारी-कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत करणाऱ्या 'आपदा मित्रांचा' सन्मान करण्यात आला.

दरम्यान, मुख्य शासकीय समारंभानंतर मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते वरसोली येथील जिल्हा परिषद शाळेत अत्याधुनिक 'इंग्लिश लँग्वेज लर्निंग लॅब'चे लोकार्पण करण्यात आले. पायाभूत सुविधा, शेती, रोजगार, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकास या सर्व क्षेत्रांचा समतोल साधत रायगडला भविष्यातील विकसित जिल्हा बनविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सातार्‍यात दिव्यांग भरतात रस्त्यावरील खड्डे, नगरपालिका ठेकेदारांचे वाढवतात धंदे....

सातारा (अजित जगताप) : छत्रपती शिवाजी महाराजांची एकेकाळी राजधानी असलेल्या सातारा शहराच्या वाढता विस्तार होत आहे. त्या मानाने नागरिक सुविधा मिळत नाही. रस्त्यात पडलेले खड्डे अनेकांच्या अपघाताला निमंत्रण देत असल्याची भावना निर्माण झाली आहे. याबाबत सातार्‍यातील दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने दिव्यांग बांधवांनी शिवतीर्थावरील रस्त्याचे खड्डे बुजवून स्वातंत्र्य दिन साजरा केला. दिव्यांग भरतात रस्त्यावरील खड्डे..... सातारा नगरपालिका काही ठेकेदारांची वाढवतात धंदे... असेच चित्र दिसत आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या 80 व्या वर्धापन दिनानिमित्त स्वातंत्र्यदिनाच्या वेळेला मोकळ्यांमध्ये अनेकांनी भारतीय नागरिकांना शुभेच्छा दिल्या. काहींनी सोशल मीडियावर कोणाच्याही मोबाईलवर सोसणार नाही. इतक्या शुभेच्छा दिलेले आहेत. परंतु कधीही आपल्या भारत मातेच्या स्वच्छतेसाठी पुढे आले नाहीत. मात्र, शरीरातील दिव्यांग आणि मनाने कणखर व मजबूत असणाऱ्या सातार्‍यातील दिव्यांग बांधवांनी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सातारा शहरातील छत्रपती शिवाजी सर्कल, पोस्ट ऑफिस कार्यालय आणि सयाजी शाळा परिसरातील रस्त्यावरील खड्डे मुजवण्यासाठी परिश्रम घेतले. नवलाईची गोष्ट म्हणजे धडधाकट माणसं वाहन चालवून पुढे जात होती. काहींनी मान खाली घालूनच पुढे जाण्यासाठी धडपड सुरू केली होती. याच रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे दोन कार्यालय आहेत. तर राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री हे सातारा व जावळीचे प्रतिनिधित्व करतात. दिव्यांग बांधवांना रस्त्यातील खड्डे बुजवण्याची वेळ आली. यातच सर्व काही आले आहे.

रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांकडे सातारा जिल्हा व सातारा नगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्था, सातारा यांच्या वतीने अनोख्या पद्धतीने 'खड्डे भरो आंदोलन' झाले.

दिव्यांग बांधवांनी स्वतः कसरत करत हातात फावडे घेऊन रस्त्यावरील खड्डे भरले. समाजाने आणि प्रशासनाने दुर्लक्षित केलेल्या प्रश्नाकडे लक्ष वेधले . या विजय उपक्रमासाठी दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री. अजय पवार, तसेच श्री. अमोल प्रकाश निकम, अमोल भातुसे, ताजभाई मुलानी, शैलेंद्र बोर्डे, शांताराम देवरे, पांडुरंग शेलार, बाळासाहेब रेवले, संतोष भोसले, देवरे दादा यांच्यासह अनेक दिव्यांग बांधव या आंदोलनात सहभाग झाले होते. अनेकांनी आपल्या हातात तिरंगा ध्वज घेऊन स्वातंत्र्य दिन साजरा केला. पण दिव्यांग बांधवांनी हातात फावडे, मुरूम- खडी व खड्डे बुजवण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य घेऊन खऱ्या अर्थाने भारत देशाची सेवा केली आहे.

"आम्हाला सहानुभूती नको, आम्हाला सुरक्षित आणि सन्मानाने चालता येईल असा रस्ता हवा," हा संदेश या आंदोलनातून प्रशासनाकडे धडधाकट व सक्षम नागरिकांच्या वतीने दिव्यांगाने विनंती केली आहे. 'आपल्या सातारा शहरासाठी आपणच काहीतरी केले पाहिजे' या भावनेतून या दिव्यांग बांधवांनी पोवई नाका परिसरातील रस्त्यावरील खड्डे भरले.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला दिव्यांग बांधवांनी केलेले हे आंदोलन म्हणजे अशी ही सातार्‍याची तऱ्हा ठरली आहे. केवळ रस्त्यावरील मोठे खड्डे भरण्याचे नव्हते, तर जिल्हा व सातारा नगरपालिका प्रशासनाला आणि समाजाला जागे करणारा संवेदनशील संदेश होता. आम्ही शरीरान दिव्यांग असलो तरी मनाने आम्ही धडधाकट आहे. काही माणसं धडधाकट असतात पण मनाने दिव्यांगच बनले आहेत याची खंत वाटत असल्याची माहिती कार्यकर्त्यांनी दिली. "ज्यांना आधाराची गरज आहे, त्यांनीच आज शहराला आधार दिला. याची इतिहासातून नोंद झाली आहे.

# सारळमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात; 'स्वातंत्र्याचे पाईक आम्ही' थीमने विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष



अलिबाग / रत्नाकर पाटील - जनता शिक्षण मंडळ प्राथमिक शाळा, सारळ येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षकांनी घोषणांचा जयघोष करत सारळ गावातून प्रभात फेरी काढली.

प्रभात फेरीनंतर शाळेच्या प्रांगणात स्थानिक शाळा समितीचे अध्यक्ष आर्य गौतम पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सुरेल आवाजात राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमधून भारताच्या स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद करणारी भाषणे केली.

यावेळी साहित्य संपदा संस्थेच्या वतीने आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी 'फिर भी दिल है हिंदुस्तानी' या देशभक्तीपर गीतावर आकर्षक टाळी कवायत सादर केली. या कवायतीसाठी मुख्याध्यापक संतोष मढवी सर आणि शिक्षिका भावना गायकवाड मॅडम यांनी विशेष मेहनत घेतली.

यंदाच्या कार्यक्रमाची 'स्वातंत्र्याचे पाईक आम्ही' ही संकल्पना विशेष आकर्षण ठरली. या संकल्पनेला अनुसरून विद्यार्थ्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या थोर स्वातंत्र्यसैनिक व नेत्यांच्या वेशभूषा साकारल्या. त्यामुळे शाळेच्या परिसरात स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाचे जिवंत दर्शन घडले.

कार्यक्रमाला स्थानिक शाळा समितीचे अध्यक्ष आर्य गौतम पाटील, समिती सदस्य हशिकेश नाईक, अभिजीत पाटील, रमेश पाटील सर, माजी सरपंच अमृता नाईक, सारळ ग्रामपंचायतीचे कर्मचारी, ग्रामस्थ, पालक, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक जे. ए. पाटील सर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संतोष मढवी सर, शाळेचे माजी कर्मचारी, शिक्षकवृंद तसेच सुमारे ५०० विद्यार्थी उपस्थित होते.

# पनवेल-शेडुंग येथील सेंट विल्फ्रेड कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा

- पावसाची तमा न बाळगता विद्यार्थी, पालक,शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी
- देशभक्तीपर गीतांनी रंगला सोहळा



पनवेल(आनंद पवार) - भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिन पनवेल-शेडुंग येथील सीबीएसई बोर्डाच्या सेंट विल्फ्रेड कॉलेजमध्ये देशभक्ती,राष्ट्राभिमान आणि उत्साहाच्या वातावरणात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.कॉलेजच्या भव्य मैदानावर सकाळी ८.३० वाजता रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पथसंचलन करून तिरंग्याला सलामी दिली.सकाळपासून पावसाने हजेरी लावली असतानाही पावसाची तमा न बाळगता विद्यार्थी,पालक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने या राष्ट्रभक्तीच्या सोहळ्यात सहभागी झाले.संस्थेचे मुख्य सेक्रेटरी तथा विश्वस्त डॉ. केशव बढाया यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.यावेळी संस्थेचे सीईओ मुकेश सोनी,सीबीएसई बोर्डाच्या प्राचार्या श्रीमती.प्रीती सिंह,स्टेट बोर्डाच्या प्राचार्या श्रीमती.स्वाती येवले,क्रीडा विभागाचे एचओडी गुरप्रीत सिंह तसेच पत्रकार आनंद पवार यांच्यासह विद्यार्थी,पालक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रभावना आणि व्यसनमुक्तीचा संदेश कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.प्रत्येक विद्यार्थ्याने राष्ट्राचा सन्मान आणि राष्ट्रभावना मनात जपली पाहिजे.व्यसनांच्या आहारी न जाता आपल्या आयुष्याचे आणि करिअरचे ध्येय निश्चित करा.राष्ट्रहितासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी सदैव सज्ज राहा, असे आवाहन त्यांनी केले. युवा पिढीने कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहून सुजाण व सुसंस्कृत नागरिक म्हणून देशहितासाठी सकारात्मक कार्य करावे,असेही भुजबळ यांनी यावेळी सांगितले.

**देशभक्तीपर गीतांनी जिंकली उपस्थितांची मने**

स्वातंत्र्य दिनानिमित्त कॉलेजच्या भव्य ऑडिटोरियममध्ये विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीतांचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे सुंदर सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या दमदार सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत टाळ्यांचा कडकडाट केला. तिरंग्याच्या साक्षीने आणि देशभक्तीच्या वातावरणात रंगलेला हा सोहळा विद्यार्थ्यांसह उपस्थितांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवणारा ठरला.

पावसाच्या सरी,हातात तिरंगा आणि मनात राष्ट्राभिमान..अशा उत्साहपूर्ण वातावरणात सेंट विल्फ्रेड कॉलेजचा ८० वा स्वातंत्र्य दिन दिमाखात संपन्न झाला.

# विद्यार्थ्यांमध्ये एड्सविषयक जनजागृती; संवेदनशीलता कार्यक्रमातून आरोग्यविषयक मार्गदर्शन



पोलादपूर / संदीप जाबडे - महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग तथा जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या वतीने आयोजित 'इंटेन्सिफाईड आयईसी कॅम्पेन' अंतर्गत रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, पोलादपूर येथे विद्यार्थ्यांसाठी एड्स प्रतिबंध व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमामध्ये सीता जाधव व अमोल नारखेडे यांनी विद्यार्थ्यांना एड्स या आजाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. एचआयव्ही/एड्स म्हणजे काय, त्याचा प्रसार कशामुळे होतो, कोणत्या मार्गाने संसर्ग होऊ शकतो तसेच कोणत्या गैरसमजांना बळी पडू नये, याबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. एड्सपासून बचाव करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, सुरक्षित व जबाबदार वर्तन, आरोग्यविषयक काळजी आणि वेळेवर तपासणीचे महत्त्व याविषयीही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

यावेळी एचआयव्ही बाधित व्यक्तींविषयी भेदभाव न करता त्यांच्याशी संवेदनशीलतेने व मानवतेच्या दृष्टिकोनातून वागणे आवश्यक आहे, असा महत्त्वपूर्ण संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबात, मित्रपरिवारात व समाजात एड्सविषयक योग्य माहिती पोहोचवून जनजागृतीमध्ये योगदान द्यावे, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विद्यालयाचे शिक्षक श्री. पंकज मिरजोळकर यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करून विद्यार्थ्यांना विषयाचे गांभीर्य समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी इंगोले मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयी असलेले गैरसमज दूर होण्यास मदत झाली असून, आरोग्यविषयक जागरूकता, सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम उपयुक्त ठरला.

# नगर परिषदेत देशभक्तीच्या उत्साहात साजरा झाला 80 वा स्वातंत्र्यदिन



किनवट (कामराज माडपेल्लीवार) : आज दि. 15 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 7.30 वाजता नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारत प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात नगराध्यक्षा मा. सौ. सुजाता विनोद एंड्रलवार यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली आणि राष्ट्रगीत गायन झाले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उपाध्यक्ष तथा नियोजन व विकास समितीचे सभापती मोहम्मद हसन म. नुर खान पठाण व युवानेते करणभाऊ एंड्रलवार उपस्थित होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानिवार, पाणी पुरवठा सभापती सौ. निलोफर भाटी, स्वच्छता व आरोग्य सभापती सौ. आश्विनी जागरलावार, क्रिडा व सांस्कृतिक सभापती सौ. नुरसबा मुकद्दर, महिला व बालकल्याण सभापती सौ. प्रिती नेम्मानिवार व उपसभापती सौ. गुलबख्त खान, नगरसेवक अभय महाजन, नगरसेविका गंगाबाई कोल्हे, स्वीकृत सदस्य तथा शिवसेना उ.बा.ठा. शहरप्रमुख प्रशांत कोरडे, नगरसेवक प्रवीण राठोड, नगरसेविका सौ ललिताबाई मुनेश्वर, नगरसेविका नईमा बेगम मिर्झा सईद बेग, नगरसेविका जरीना खान साजिद खान, नगरसेविका शेख सादिका इम्रान, नगरसेविका निकिता आयनेनिवार, नगरसेविका सरोजिनी ओद्दीवार, स्वीकृत सदस्य साजिद खान निसार खान, नगरसेवक सुरज सातुरवार, नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार, नगरसेवक श्रीनिवास नेम्मानिवार, नगरसेवक अभय नगराळे, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, अशोक भालेराव, मिलिंद घुले, स्वानंद मामीलवाड, नगराध्यक्ष यांचे कायदेविषयक सल्लागार अँड. दिनेश येऊतकर, राजेश जोशी सर, मुकेश नेम्मानिवार, विष्णू पुजारी, परमेश्वर काचमोडे, यांच्यासह सर्व कर्मचारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. शहीद जवानांना श्रद्धांजली वाहून देशाच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प करण्यात आला.

# सिटीफ्लो आणि सलाम बॉम्बे फाउंडेशन यांनी यंदा स्वातंत्र्यदिनी मुंबईला आपला वर्ग बनवण्यासाठी सहयोग केला

**■ एका विशेष स्वातंत्र्यदिन सफारीद्वारे (टूर) सलाम बॉम्बे फाउंडेशनच्या फोटोग्राफी प्रोग्राममधील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या लेन्सच्या माध्यमातून शहराचे सौंदर्य टिपत मुंबईतील प्रमुख ठिकाण आणि जिवंत इतिहासाचा अनुभव घेतला**




मुंबई : या स्वातंत्र्यदिनी, सिटीफ्लो या भारतातील प्रमुख नागरी बस प्रवास सेवा पुरवणाऱ्या कंपनीने सलाम बॉम्बे फाउंडेशन (एसबीएफ) सोबत सहयोगाने सलाम बॉम्बे फाउंडेशनच्या १५ विद्यार्थ्यांच्या गटासाठी मुंबईभर एका विशेष शैक्षणिक सफारीचे (टूर) आयोजन केले, जिथे त्यांना एकाच प्रवासात शहराचा इतिहास, वारसा, संस्कृती आणि समकालीन ओळख यांचा अनुभव घेता आला.

ही सफारी विद्यार्थ्यांसाठी वर्गाच्या पलीकडे जाऊन मुंबईचा अनुभव घेण्यासाठी आणि शहर व देशाला आकार देणाऱ्या जागांशी व कथांशी जोडले जाण्यासाठी डिझाइन करण्यात आली होती. सिटीफ्लो बसच्या आरामदायी प्रवासातून विद्यार्थ्यांनी गेटवे ऑफ इंडिया, मणी भवन आणि ऑगस्ट क्रांती मैदान, तसेच सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट गॅलरीला भेट दिली आणि बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मारकाच्या जागेवरूनही प्रवास केला. या प्रवासात पॅराडॉक्स म्युझियमला देखील भेट देण्यात आली, ज्यामुळे या सफारीमध्ये आधुनिक आणि अनुभवात्मक दृष्टिकोन मिळाला. सलाम बॉम्बे फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रवास स्वतःच्या लेन्सद्वारे मुंबई शहराला टिपण्याची एक संधी बनला. विद्यार्थ्यांनी या सफारीदरम्यान प्रमुख ठिकाण, वास्तुकला आणि खास क्षणांचे फोटो कॅप्चर केले, ज्यातून शहराबद्दलचा त्यांचा वैयक्तिक दृष्टिकोन समोर आला. त्यांनी कॅप्चर केलेले निवडक फोटो सिटीफ्लोच्या प्लॅटफॉर्म्सवरून शहरभर प्रदर्शित केली जातील, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा मुंबईबाबत दृष्टिकोन अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल. या उपक्रमामध्ये सिटीफ्लोचे सामायिक व शाश्वत नागरी वाहतुकीवरील लक्ष आणि सलाम बॉम्बे फाउंडेशनचे माध्यम, कला, क्रीडा व व्यावसायिक कौशल्य विकासातील शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुलांना गरीबीच्या चक्रातून बाहेर पडण्यासाठी सक्षम करण्याचे कार्य एकत्र पाहायला मिळाले. सिटीफ्लो दैनंदिन नागरी प्रवास अधिक आरामदायी करण्यासाठी आणि सामायिक वाहतुकीच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे, तर सलाम बॉम्बे फाउंडेशन विद्यार्थ्यांना कौशल्य, आत्मविश्वास आणि सर्जनशील अभिव्यक्ती विकसित करण्यासाठी प्लॅटफॉर्म्स उपलब्ध करून देते. सिटीफ्लोचे सह-संस्थापक, सीएमओ आणि हेड ऑफ सिटीफ्लो कॉर्पोरेट संकल्प केळशीकर म्हणाले , "सिटीफ्लोमध्ये आमचा विश्वास आहे की, शहरामधील वर्दळीचा थेट संबंध ते कसे विकसित होते याच्याशी असतो. अधिक सुलभ, शाश्वत आणि राहण्यायोग्य शहरे उभारण्याची आमची कटिबद्धता केवळ वाहतुकीपुरती मर्यादित नाही, तर आम्ही ज्या समुदायांना सेवा देतो त्यांच्या जीवनात मोलाची भर घालणारे अनुभव निर्माण करणे हाही त्यामागील उद्देश आहे. सलाम बॉम्बे फाउंडेशनसोबत सहयोगामुळे आम्हाला विद्यार्थ्यांना त्यांचे शहर अनुभवण्याची, शहराच्या इतिहासाशी जोडले जाण्याची आणि शहराच्या भविष्याची कल्पना करण्याची संधी देता आली. त्यांनी फोटो कॅप्चर करण्याच्या माध्यमातून हा प्रवास टिपताना पाहण्याचा अनुभव अधिक अर्थपूर्ण करणारा ठरला आणि त्यांच्या या दृष्टिकोनाचा मुंबईभर प्रचार केला जात राहिल, अशी आम्हाला आशा आहे."

सलाम बॉम्बे फाउंडेशनचे कम्युनिकेशन्स प्रमुख सॅविओ पाशाणा म्हणाले, "तरुण पिढीला शोध घेण्याची, निरीक्षण करण्याची आणि स्वतःला व्यक्त करण्याची संधी दिली जाते, तेव्हा शिक्षण कुठेही घडू शकते. या शैक्षणिक सफारीने आमच्या विद्यार्थ्यांना मुंबईच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाशी जुडले जाण्याची, तसेच एका आधुनिक दृष्टिकोनातून शहराचे निरीक्षण करण्याची अमूल्य संधी उपलब्ध करून दिली. सिटीफ्लो बसेसमध्ये आपले काम प्रदर्शित केले जाण्याची ही संधी आमच्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अर्थपूर्ण प्लॅटफॉर्म प्रदान करते. आम्हाला शिक्षण, सर्जनशीलता आणि व्यावसायिक संधी एकत्र आणणाऱ्या या स्वातंत्र्यदिन अनुभवाची रचना करण्यासाठी सिटीफ्लोसोबत सहयोग करताना आनंद होत आहे."

हा सहयोग सामायिक विश्वासाला अधोरेखित करतो की, शहरातून प्रवास केल्यानंतर शहराबाबत सर्वोत्तमपणे समजते आणि दैनंदिन प्रवास तरुणांच्या कथा पुन्हा शहरापर्यंत पोहोचवू शकतो.

## मराठी उद्योजकतेची ग्लोबल भरारी!; फ्रान्स सरकारच्या मालकीच्या EDF Group शी संबंधित Citelum India आता Krystal Integrated Services चा 100% भाग असणार




मुंबई": मराठी उद्योजकतेने आता जागतिक दर्जाच्या कंपन्यांच्या अधिग्रहणातून ग्लोबल स्टेजवर आपली ताकद सिद्ध करण्याच्या दिशेने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. Krystal Integrated Services Limited ने Citelum India Private Limited मधील 100 टक्के हिस्सा संपादित केला असून, Citelum India आता Krystal Integrated Services ची पूर्ण मालकीची उपकंपनी झाली आहे. Citelum India ही पूर्वी फ्रान्सच्या EDF Group (Électricité de France) शी संबंधित कंपनी होती. EDF हा फ्रान्स सरकारच्या मालकीचा ऊर्जा समूह आहे. त्यामुळे या अधिग्रहणाला भारतीय, विशेषतः मराठी उद्योजकतेच्या जागतिक विस्ताराच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

Krystal Integrated Services च्या CMD सौ. नीता प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखाली कंपनीने Integrated Facility Management पासून, पुढे जात आता City Lighting आणि Urban Infrastructure या भविष्योन्मुख क्षेत्रात दमदार प्रवेश केला आहे.

Citelum India ही 2011 पासून भारतात कार्यरत असून शहरी पथदिवे, ऊर्जा-कार्यक्षम प्रकाशयोजना, lighting infrastructure ची design, engineering, installation आणि operation & maintenance यामध्ये विशेष अनुभव असलेली कंपनी आहे. तसेच connected lighting, traffic signals, artistic lighting, video protection, EV charging, air-quality monitoring आणि इतर smart-city services यांसारख्या आधुनिक सुविधांमध्येही कंपनीची तांत्रिक क्षमता आहे.

₹100 कोटींची गुंतवणूक; 5,000 हून अधिक रोजगारनिर्मितीचे लक्ष्य

Citelum India च्या तांत्रिक कौशल्याला Krystal च्या मजबूत operational platform ची जोड देत कंपनीने पुढील 3 ते 4 वर्षांत या नव्या vertical मधून ₹300 ते ₹350 कोटी वार्षिक महसूल मिळविण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. या विस्तारासाठी कंपनीकडून सुमारे ₹100 कोटींची गुंतवणूक engineering capabilities, technology platforms आणि business expansion साठी करण्यात येणार आहे.

तसेच देशातील 30 ते 40 शहरांमध्ये आणि 12 ते 15 राज्यांमध्ये Urban infrastructure services चा विस्तार करण्याचे नियोजन असून, या क्षेत्रातून 5,000 हून अधिक skilled आणि semi-skilled रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. Smart Cities ते EV Infrastructure — नव्या भारताच्या विकासाला नवी दिशा

या अधिग्रहणामुळे Krystal Integrated Services च्या सेवा क्षेत्रात मोठी वाढ होणार असून, Connected Lighting, Smart Metering, EV Charging Infrastructure आणि आधुनिक शहरांसाठी आवश्यक असलेल्या विविध electrical solutions मध्ये कंपनी विस्तार करणार आहे.

आज भारत झपाट्याने urbanisation आणि technology-driven infrastructure च्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा काळात ऊर्जा बचत, स्मार्ट पथदिवे, डिजिटल monitoring, EV infrastructure आणि दीर्घकालीन operation & maintenance यांची मागणी वाढत आहे. Citelum India चा अनुभव आणि Krystal ची operational ताकद यांचा संगम या क्षेत्राला नवी गती देऊ शकतो.

"मराठी उद्योजकता आता ग्लोबल स्टेजवर!"

मुंबईच्या भूमीतून उभ्या राहिलेल्या मराठी उद्योजकतेने आज फ्रान्सशी संबंधित आंतरराष्ट्रीय कंपनीच्या भारतीय व्यवसायाचे अधिग्रहण करून जागतिक व्यवसायविश्वात आपली क्षमता दाखवून दिली असल्याने ही मराठी उद्योजकतेच्या आत्मविश्वासाची, दूरदृष्टीची आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याच्या क्षमतेची नवी ओळख आहे.

"Local Roots, Global Vision" या विचारातून Krystal Integrated Services आता भारतातील शहरी पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

## १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त सर ज.जी. समूह रुग्णालय येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटप



**मुंबई :** १५ ऑगस्ट म्हणजेच स्वातंत्र्यदिनी शाळा, कार्यालय आणि सोसायट्यांमध्ये ध्वजारोहणानंतर सहसा खाऊ म्हणून लाडू, जिलेबी किंवा खाऊचे वाटप केले जाते. या उत्सवाचा मुख्य उद्देश देशभक्तीची भावना वाढवणे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करणे हा आहे.

सर ज.जी.समूह रुग्णालय येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन हा कार्यक्रम खूप मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सर ज.जी. समूह रुग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या शुभ हस्ते झेंड्याला वंदन केले जाते त्यानंतर जे. जे. रुग्णालयातील सर्व वर्गीय कर्मचारी डॉक्टर्स, स्टाफ गर्स, वर्ग १ ते वर्ग ४ कर्मचारी विविध कार्यक्रमाचे आयोजन करतात त्यामध्ये लेझीम, विविध प्रकारचे नृत्य, नाचगाणी, दहीहंडीचा कार्यक्रम, खाऊ वाटप व मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट कक्ष निवडून त्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक देऊन गौरव करण्यात येतो.

यावर्षीपासून सर ज.जी.समूह रुग्णालय तृतीय श्रेणी संघटना व मराठा क्रांती स्वराज्य राष्ट्रीय संघटना, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त कर्मचारी बांधवांच्या इयत्ता ५ वी ते १० वीच्या गरजू मुला मुलींसाठी मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाला सर ज.जी. समूह रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय भांडारवार, सहयोगी अधिष्ठाता डॉ.रणजीत माणकेश्वर, वैद्यकीय अधीक्षक संजय सुरासे, मराठा क्रांती स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष संस्थापक सदानंदराव भोसले व त्यांचे सर्व पदाधिकारी तसेच तृतीय श्रेणी संघटनेचे संघटना प्रमुख चंद्रकांत साळुंके, सचिव अरुण जाधव, खजिनदार रामदास गोळे हे उपस्थित होते अशी माहिती तृतीय श्रेणी संघटनेचे अध्यक्ष सुरेश तांबे यांनी दिली.

## पुण्यात 'से ट्रीज'चे नवे प्रादेशिक केंद्र सुरू

पुणे (निलेश खंदारे): पर्यावरण संवर्धन क्षेत्रात कार्यरत 'से ट्रीज' संस्थेने वडगाव बुद्रुक येथील जाधव नगर परिसरात नव्या पूर्णवेळ प्रादेशिक केंद्राचे उद्घाटन केले. महाराष्ट्रातील पर्यावरण पुनरुज्जीवन, जलसुरक्षा आणि समुदायाच्या सहभागातून राबविण्यात येणाऱ्या शाश्वत उपक्रमांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हे केंद्र महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

या केंद्रामुळे स्थानिक समुदाय, महापालिका प्रशासन, उद्योग क्षेत्र, संरक्षण आस्थापना आणि शैक्षणिक संस्थांसोबत भागीदारी अधिक मजबूत होणार आहे. पुणे परिसरात संस्थेने आतापर्यंत उल्लेखनीय काम केले असून, कासरवाडी, आकुर्डी, कोडित खुर्द आणि नॅशनल डिफेन्स अकॅडमी येथे चार शहरी मियावाकी जंगलांच्या माध्यमातून ५७ हजार ९५० हून अधिक रोपांची लागवड केली आहे.

तसेच पुरंदर, बारामती आणि केंदूर येथे १८ तलाव पुनरुज्जीवन प्रकल्प राबवून जलस्रोतांचे संवर्धन आणि स्थानिक जलपरिसंस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

'से ट्रीज'चे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी देवकांत पयासी यांनी सांगितले की, पुण्यातील नव्या केंद्रामुळे स्थानिक समुदाय आणि विविध संस्थांशी थेट संपर्क वाढेल. त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यावरण पुनरुज्जीवन, जलसंवर्धन आणि हवामान बदलाच्या आव्हानांवर कामाला अधिक गती मिळेल.

संस्थेच्या संरक्षण व शासकीय प्रकल्पांच्या प्रमुख वंदना तुम्मलापल्ली यांनी हे केंद्र सरकार आणि संरक्षण क्षेत्रातील भागधारकांशी समन्वय वाढविण्यास उपयुक्त ठरेल, असे सांगितले.

ॲग्रोफॉरेस्ट्री आणि ग्रामीण विकास प्रकल्पांचे प्रमुख महीधर रेड्डी एस. यांनी कृषी-वनीकरण, शाश्वत जमीन पुनरुज्जीवन आणि ग्रामीण उपजीविकेला चालना देण्यावर भर दिला. या माध्यमातून जैवविविधता वाढविण्यासह शेतकरी आणि ग्रामीण समुदायांचे जीवनमान सुधारण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे.

## भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील ५ समभागांवर गुंतवणूकदारांचे लक्ष

मुंबई (निलेश खंदारे) : भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्षेत्राचा वेगाने विस्तार होत असून, वाढती वीजमागणी, अनुकूल सरकारी धोरणे आणि खासगी गुंतवणुकीमुळे अक्षय ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांसाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर टाटा पॉवर, एनटीपीसी ग्रीन एनर्जी, अदानी ग्रीन एनर्जी, वारी एनर्जीज आणि गुजरात इंजेक्ट केरळ लिमिटेड या कंपन्यांकडे गुंतवणूकदारांचे लक्ष वेधले जात आहे.

टाटा पॉवरने सौर ऊर्जा, छतावरील सौर प्रणाली, विद्युत वाहनांसाठी चार्जिंग सुविधा आणि अक्षय ऊर्जा निर्मितीमध्ये विस्तार केला आहे. आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत कंपनीचा महसूल १८,८९८ कोटी रुपये, तर निव्वळ नफा १,४०१ कोटी रुपये राहिला.

एनटीपीसी ग्रीन एनर्जी सौर, पवन आणि हरित हायड्रोजन प्रकल्पांच्या माध्यमातून ऊर्जा संक्रमणात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पहिल्या तिमाहीत कंपनीच्या निव्वळ नफ्यात ३८ टक्क्यांची वाढ होऊन तो ३०५ कोटी रुपयांवर पोहोचला.

अदानी ग्रीन एनर्जीच्या वीज विक्रीत २९ टक्क्यांची वाढ होऊन महसूल ४,२८० कोटी रुपये झाला. कंपनीच्या मोठ्या सौर आणि पवन प्रकल्पांमुळे तिच्या अक्षय ऊर्जा क्षमतेत सातत्याने वाढ होत आहे.

वारी एनर्जीजच्या महसुलात पहिल्या तिमाहीत ७९ टक्क्यांची वाढ होऊन तो ७,९३२ कोटी रुपये झाला, तर निव्वळ नफा ८५० कोटी रुपये राहिला. दुसरीकडे, गुजरात इंजेक्ट केरळने सौर प्रकल्पांच्या माध्यमातून व्यवसाय विस्ताराला चालना दिली आहे.

अक्षय ऊर्जा क्षेत्राची दीर्घकालीन वाढ लक्षात घेता या कंपन्यांकडे संधी निर्माण होत असल्या तरी, समभागांमध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीची आर्थिक स्थिती, मूल्यांकन, कर्जबाजारीपणा आणि बाजारातील जोखीम यांचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादिका सौ. सीमा प्रमोद मोरे यांनी मातोश्री प्रिंटींग प्रेस, मातोश्री बंगला, जिजामाता शाळेसमोर, वडवली सेक्शन, अंबरनाथ (पूर्व), जिल्हा ठाणे, महाराष्ट्र- ४२१५०१ येथे छापून, ६६/६८, बंखरिया बिल्डिंग, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र- ४००००१ येथून प्रकाशित केले. ईमेल-aplesamrajyamumbai@gmail.com / Mob. No. 7038444707 /95277948777

Aaplesamrajya Daily Owner, Printer, Publisher, Editor Seema Pramod More Printed At . Matoshri printing press, Matoshri Bungla, Opp. Jijamata School, Vadavli Section, Ambernath (East), District Thane, Maharashtra- 421501, Publish At. 2 Floor-GRD,Plot 57,66/68, Bankharia Building, Modi Street, Fort, Mumbai, Maharashtra- 400001